




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०६ ●शुक्रवार,दि.०६ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये



● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बीड यांची धडक कारवाई



## जिल्ह्यातील सहा शाळा तपासणी केल्या असता तीन शाळांमध्ये सुविधेचा व विद्यार्थी संख्या कमी असल्याने मान्यता रद्द

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक धोरणानुसार अंध, मूकबधिर, मतिमंद आणि अस्थिव्यंग प्रवर्गातील ४८ शाळा कार्यरत आहेत. सदर दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि शिक्षणासह इतर सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे. या बाबत शासन स्तरावरून वेतन आणि वेतनेतर अनुदान देण्यात येते. मा. तुकाराम मुंढे, सचिव, दिव्यांग कल्याण, मुंबई यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेची अचानक तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.**

या तपासणी मध्ये ६ शाळांची तपासणी करण्यात आली असून ३ शाळा विद्यार्थी संख्या कमी असणे व भौतीक सुविधा उपलब्ध करून न देणे या बाबतीत दोषी आढळून आल्याने त्यांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव आयुक्त दिव्यांग कल्याण पुणे यांना सादर केला आहे. अतिरिक्त कर्मचारी यांचे समायोजन करण्यात येणार असून तसे प्रस्ताव देखील आयुक्त दिव्यांग कल्याण पुणे यांना सादर करण्यात आले आहेत. अस्थिव्यंग तळेगाव, मतिमंद शाळा, बीड आणि मूकबधिर शाळा, तांबराजुरी या शाळांची मान्यता रद्द होणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच शाळांची तपासणी करण्यात येणार असून दोषी आढळून आल्यास वेतनेतर अनुदान बंद करून अनुद्याप्ती रद्द चा प्रस्ताव वरिष्ठांना पाठवला जाईल. शासनाच्या धोरणाo udise plus मधील नोंदीनुसार पडताळणी करून धडक कारवाई चे संकेत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बीड श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी दिले असून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत १०० टक्के शाळांची सखोल चौकशी करून तसा अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही संस्थेच्या दबावाला न जुमानता वस्तुनिष्ठ अहवाल देण्यात येणार आहे. दिव्यांग कल्याण विभाग हा नव्याने सुरू झाला असून आता या विभागाने उत्तम कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे. त्यामुळे अशी माहिती दिव्यांग कल्याण विभागामधून प्राप्त झाली आहे.

दिव्यांग शाळा म्हणजे दिव्यांग (अपंग) मुलांसाठी विशेष गरजांनुसार शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन देणाऱ्या शाळा असतात, ज्यांना सरकारकडून अनुदान मिळते किंवा त्या खासगी संस्था चालवतात; या शाळांमध्ये श्रवणदोष, अंधत्व, मानसिक अक्षमता अशा विविध प्रकारच्या दिव्यांगांसाठी खास सोयीसुविधा, व्यावसायिक प्रशिक्षण आणि फिजिओथेरपीसारख्या सेवा उपलब्ध असतात, ज्यामुळे मुलांना त्यांच्या क्षमतांनुसार शिकता येते.

### दिव्यांग शाळांची वैशिष्ट्ये

समावेशक शिक्षण: या शाळा सामान्य मुलांसोबतच दिव्यांग मुलांना एकत्र आणून त्यांना शिक्षण देतात, जेणेकरून ते समाजाचा भाग बनू शकतील.

विशेष प्रशिक्षण: यात व्यावसायिक प्रशिक्षण, स्पीच थेरपी, फिजिओथेरपी आणि कौशल्य विकासावर भर दिला जातो.

सुविधा: रॅम्प, व्हिलचेअर, लिफ्ट आणि इतर गरजेच्या साधनांची सोय असते.

विविध प्रकार: अंध, कर्णबधिर, मतिमंद (Mentally Retarded) आणि शारीरिकदृष्ट्या अक्षम मुलांसाठी वेगळ्या शाळा किंवा विभाग असतात.

# शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शनाची तयारी करा : पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

## परळीतील महापशुधन एक्स्पोच्या तयारीचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.



बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पशुपालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीविषयक तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी महापशुधन एक्स्पो महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी. हे ▶▶ उर्वरित पान २ वर

# मच्छिंद्रनाथ गडावर भाविकांचे दागिने लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव येथील प्रसिद्ध मच्छिंद्रनाथ (मायंबा) गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा अंभोरा पोलीस ठाणे व बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत पर्दाफाश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, अवघ्या १५ दिवसांच्या कालावधीत अंभोरा पोलिसांनी उघड केलेली ही दुसरी मोठी टोळी असून,

### सीसीटीव्ही व गोपनीय माहितीचा वापर

**सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे तसेच बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय खबऱ्यांच्या माहितीच्या आधारे पाथर्डी येथील सुधीर कराळे याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपल्या पाच साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून, त्याच्या इतर साथीदारांचा पोलिसांकडून कसून शोध सुरू आहे. या यशस्वी कारवाईत पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आदिनाथ भडके, हरिभाऊ बांगर, कृष्णा नरवडे व जयराम उबे यांनी मोलाची कामगिरी बजावली.**

या कारवाईमुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील ही टोळी गडावरील प्रचंड गर्दीचा फायदा घेत होती. महिला भाविकांना धक्काबुक्की करणे, बोलण्यात गुंतवणे किंवा गळ्यात हात टाकून हातचलाखीने दागिने लंपास करणे, अशी त्यांची ठरलेली ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोलिसांना 'कामाला' लावणे नडले! 'डायल ११२' वर फेककॉल, बीडच्या तरुणाची कारागृहात रवानगी

गेवराई । प्रतिनिधी

संकटकाळात सर्वसामान्यांच्या मदतीसाठी अहोरात्र सज्ज असलेल्या 'डायल ११२' या आपत्कालीन सेवेचा गैरवापर करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. पोलिसांना विनाकारण त्रास देऊन त्यांना उलट उत्तरे देणाऱ्या कुंभारवाडी येथील प्रदोष गंगाधर



जाधव या तरुणाची न्यायालयाने ९ फेब्रुवारीपर्यंत कारागृहात रवानगी केली आहे. नेमका काय घडला

### धमकी दिली अन् कोठडीत गेला!

**माहिती खोटी असल्याचे लक्षात आल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मात्र, आरोपीचा उद्दामपणा इथेच थांबला नाही. त्याने पोलिसांना तुम्ही कशी नोकरी करता तेच बघतो अशी धमकीही दिली. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत त्याला विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले. न्यायालयाने त्याची रवानगी बीड जिल्हा कारागृहात केली आहे.**

प्रकार? ३० जानेवारी रोजी रात्री १०:२० च्या सुमारास प्रदोषने डायल ११२ वर फोन केला आणि मादळमोही येथील एका ट्रेडिंग कंपनीत सोने-चांदीची मोठी चोरी झाल्याची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपनिरीक्षक राजभाऊ गर्जे आणि त्यांचे पथक तातडीने कामाला लागले. मात्र, जेव्हा पोलिसांनी त्याला पत्ता विचारण्यासाठी पुन्हा संपर्क ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यात माजी सैनिकांच्या प्रश्नांना थेट वाट करून देणाऱ्या बाईक रॅलीचे तहसीलदार शेळके यांनी केले स्वागत

बीड । प्रतिनिधी

इंडियन आर्मी बॉम्बे इंजिनीअर ग्रुप खडकी येथील सेवानिवृत्त जवानांनी महाराष्ट्रभर फिरत माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ही रॅली काढली आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, लातूर मार्गे ही रॅली बुधवारी ४ फेब्रुवारी रोजी बीडमध्ये पोहोचली. यावेळी बीडचे ▶▶ उर्वरित पान २ वर



# मुलीच्या लग्नाचे कर्ज फेडायचे कसे ? या विवंचनेतून मजुराने उचलले टोकाचे पाऊल



केज । प्रतिनिधी

मुलीच्या लग्नासाठी हात उसने घेतलेले पैसे कसे फेडायचे ? या विवंचनेतून केज तालुक्यात एका मजुराने गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना घडली आहे. सोनीजवळा (ता. केज) येथील रंजीत यादव वैरागे वय (४३ वर्ष) असे जीवन संपवलेल्या मजुराचे नाव आहे. हे मजुरी करून कुटुंबाची उपजीविका भागवित होते. त्यांनी मुलीच्या लग्नासाठी लोकांकडून व नातेवाईकांकडून हात उसने पैसे घेऊन मुलीचे लग्न केले होते. हाताला नियमित रोजगार नसल्याने हे पैसे कसे फेडायचे ? या विचाराने ते चिंताग्रस्त होते. शेवटी रंजीत वैरागे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बुडीत पतसंस्था मल्टीस्टेट ठेवीदारांचा २४ फेब्रुवारीला मुंबईत मोर्चा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बुडीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँसाहेब जिजाऊ, सह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी ठेवीदार आता थेट रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. या पार्श्वभूमीवर परळी व माजलगाव येथे ठेवीदारांच्या बैठका घेण्यात आल्या. मुंबईत होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा ठाम निर्धार यावेळी ठेवीदारांनी व्यक्त केला असल्याचे ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक यांनी सांगितले.

२४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे ठेवीदारांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चाच्या नियोजनासाठी तसेच ठेवीदारांमध्ये जागृती करण्यासाठी मराठवाड्यात शाखानिहाय बैठका घेतल्या जात आहेत. परळी व माजलगाव येथील बैठकीत ठेवीदार कृती समितीचे मुख्य ▶▶ उर्वरित पान २ वर

# हळदीच्या दिवशीच नवरदेवाच्या दुकानाला भीषण आग; ३० लाखांचे नुकसान, घातपाताचा संशय

बीड । प्रतिनिधी

एका बाजूला लग्नाची लगबग आणि आनंदाचे वातावरण असताना, दुसरीकडे नियतीने मात्र अत्यंत क्रूर डाव मांडला. केज येथील शिक्षक कॉलनी परिसरात असलेल्या एका प्लम्बिंगच्या दुकानाला बुधवारी मध्यरात्री अचानक आग लागली. या आगीत नवरदेव असलेल्या दुकानदाराचे ३० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. धक्कादायक म्हणजे, ज्या दिवशी दुकानदाराची हळद आणि लग्न होते, त्याच दिवशी ही घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बुधवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास केज पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना त्यांना धुराचे लोट दिसले. त्यांनी वेळ न घालवता तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. पोलिसांनी वेळीच ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड्स

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचा महामंच असलेला Reseal.in प्रस्तुत महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड२०२५ या भव्य पुरस्कार सोहळ्याचे भागी दार सौ संध्या सुधीर सरोदे भावसार यांना मराठी चित्रपट मंचावर असलेल्या प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी तसेच Reseal.in चे डायरेक्टर, ceo फाउंडर यांच्या सानिध्यात गौरविजेता पुरस्कार सन्मान देण्यात आला असून बीड जिल्ह्यात अत्यंत कुशलतेने आपल्या आर्ट्स कलेतून ग्लॅमर ब्युटी सलून तसेच वेलनेस अकॅडमी च्या माध्यमातून महाराष्ट्र उद्योग विकास MSME, MCED ITI skills Development institute of science technology . मुली व महिलांना स्वतःच्या स्वप्नाचे पंख देण्याचे काम करत आहेत त्यांचे म्हणणे आहे की परळी तालुक्यातील व जवळपास ग्रामीण



भागातील मुली व महिलांना मोठ्या शहरात न जाता आता सर्व सोयीनुसार त्यांना हाय एज्युकेशन देण्याचे काम ब्युटी अँड वेलनेस अकॅडमी करत आहेत सौंदर्य नवे तर हेल्थ पण या दोन्ही बाजूचा एज्युकेशन यांच्या अकॅडमीमध्ये मुलींना मिळेलच परत महिलांना व मुलींना राहण्यासाठी अकॅडमी प्लस होस्टेल उत्तमरीत्या सोय केली जाईल परळी जिल्ह्यामध्ये महिलांच्या विकासासाठी कलेचा मान सन्मान करून महिलांना आत्मनिर्भय स्वालंबी बनवून त्यांना करियर एज्युकेशन बिजनेस व जॉब अपॉर्च्युनिटी दिल्या जातील तसेच सेंटर मार्फत पन्नास हजार ते वीस लाखापर्यंत लोन दिले जाईल. महिलांनी संधीचा लाभ घ्यावा. हाय डिमांडेड हेअर स्किन नेल्स अरोमा स्पा तसेच योगा डायट अँड न्युट्रिशन असे प्रोफेशनल क्लासेस दिल्या जातील. सोबत फ्री हेल्थ बद्दल मार्गदर्शन वेळोवेळी मोटिवेशन हॅन्ड्स टू हॅंड प्रॅक्टिस दर महिन्याला नवीन सेमिनार इत्यादी संधी दिल्या जातील.




# अत्याचाराला नाही, सन्मानाला होकार

दरवर्षी ६ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय शून्य सहिष्णुता दिवस साजरा केला जातो. हा दिवस मुख्यतः महिलांवरील जननेंद्रिय छेदन (FGM) या अमानवी प्रथेविरोधात जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केला आहे. मात्र, या दिवसाचे महत्त्व केवळ एका समस्येपुरते मर्यादित नसून, तो समाजातील सर्व प्रकारच्या अन्याय, शोषण, हिंसा आणि भेदभावाविरोधातील संघर्षाचे प्रतीक बनला आहे. आज विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेच्या युगातही अनेक समाजांमध्ये परंपरेच्या नावाखाली अमानवी कृत्ये सुरू आहेत. महिलांचे शरीर, भावना आणि स्वातंत्र्य यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर जबरदस्तीने लादल्या जाणाऱ्या प्रथा आजही अस्तित्वात आहेत. जननेंद्रिय छेदन ही केवळ शारीरिक जखम नसून, ती आयुष्यभर मानसिक वेदना देणारी प्रक्रिया आहे. अशा प्रथा महिलांच्या आरोग्यावर, आत्मसन्मानावर आणि सामाजिक स्थानावर गंभीर परिणाम करतात.

दुर्दैवाने, अनेकदा अशा अत्याचारांना समाजाकडून मूक संमती मिळते. हे आपल्या परंपरेचा भाग आहे किंवा हे पूर्वीपासून चालत आले आहे अशा कारणांनी अन्यायाचे समर्थन केले जाते. परंतु कोणतीही परंपरा माणुसकीपेक्षा मोठी असू शकत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी कोणतीही प्रथा स्वीकारार्ह ठरू शकत नाही.

'शून्य सहिष्णुता' ही संकल्पना केवळ घोषणापुरती मर्यादित न राहता, ती कृतीत उतरवणे आज अत्यंत गरजेचे आहे. महिलांवरील हिंसा, हुंडाबळी, कौटुंबिक छळ, लैंगिक शोषण, बालविवाह, मानवी तस्करी यांसारख्या समस्या आजही समाजाला पोखरत आहेत. कायदे अस्तित्वात असतानाही अनेक गुन्हेगार मोकळे फिरतात, कारण पीडितांना न्याय मिळवण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळत नाही. यामागे असलेले एक मोठे कारण म्हणजे भीती, लाज आणि सामाजिक दबाव. अनेक महिला अन्याय सहन करत राहतात, कारण समाज त्यांच्यावरच दोष ठेवतो. तिनेच काळजी घ्यायला हवी होती किंवा तिने विरोध केला नसता तर असे




घडले नसते अशा मानसिकतेमुळे पीडित व्यक्ती अधिक एकाकी पडते. ही मानसिकता बदलणे हेच खरे परिवर्तन आहे. शिक्षण हा समाजपरिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. मुला-मुलींना लहानपणापासून समानतेचे, सन्मानाचे आणि संवेदनशीलतेचे संस्कार दिले पाहिजेत. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांनी मानवी हक्क, लैंगिक समानता आणि कायदेशीर अधिकारांबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. केवळ महिलांनाच नव्हे, तर पुरुषांनाही या चळवळीत सक्रिय सहभागी करणे गरजेचे आहे.

माध्यमे आणि सोशल मीडियाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. सनसनाटी बातम्यांपेक्षा वास्तव परिस्थितीचे जबाबदारीने चित्रण करून समाजाला विचार करायला भाग पाडले पाहिजे. सकारात्मक उदाहरणे, यशोगाथा आणि संघर्षकथा समाजाला प्रेरणा देऊ शकतात. सरकारनेही केवळ योजना जाहीर करून थांबू नये, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. पोलीस यंत्रणा, न्यायालये आणि प्रशासन यांनी संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे. पीडितांना त्वरित मदत, संरक्षण आणि न्याय मिळाला पाहिजे. अन्यथा, कायदे केवळ कागदावरच राहतात. आंतरराष्ट्रीय शून्य सहिष्णुता दिवस आपल्याला आत्मपरीक्षणाची संधी देतो. आपण खरोखरच अन्यायाविरोधात उभे राहतो का, की फक्त सोशल मीडियावर संदेश शेअर करून समाधान मानतो? खरा बदल तेव्हाच घडतो, जेव्हा प्रत्येक नागरिक अन्याय पाहून गप्प न बसता आवाज उठवतो.

आज गरज आहे ती संवेदनशील, जागरूक आणि जबाबदार समाजनिर्मितीची. जिथे महिलांना भीतीशिवाय जगता येईल, जिथे मुलींना स्वप्ने पाहण्याचे स्वातंत्र्य असेल, आणि जिथे माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळेल. अत्याचाराविरोधात शून्य सहिष्णुता म्हणजे कठोर भूमिका नव्हे, तर मानवतेची खरी ओळख आहे. न्याय, समानता आणि सन्मान यांवर आधारित समाज उभा करणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे.

**– शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

# यंदा बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त होणार का?

राज्यात बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते. शिवाय या दोन्ही परीक्षा नेहमीच्या शाळा आणि महाविद्यालयांत न होता या परीक्षांसाठी अन्य केंद्रात जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांवर अपरिचित वातावरणात परीक्षा देण्याचा ताणही असतो. परीक्षा काळात समस्त परिक्षाकेंद्रात पोलीस शिपाई नियुक्त केले जातात, कॉपी करण्याच्या प्रथेवर आळा घालण्यासाठी शासनाचे भरारी पथक कार्यरत असते. शाळेतील पर्यवेक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असते. यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत. परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत अशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात येणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री स्वतः जातीने लक्ष घालत आहेत. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे.

या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लुप्त्या शोधून काढतात. दरवर्षी परीक्षाकाळात प्रतिदिन यासंदर्भातील बातम्या वाचायला मिळतात. काही ठिकाणी आपल्या शाळेचा निकाल चांगला लागावा यासाठी पर्यवेक्षक शाळेतील मुलांना पुस्तके पुरवतात. काही ठिकाणी तर बोर्डाच्या परीक्षेच्या काळात ठराविक कमिशनच्या मोबदल्यात थेट बाकापर्यंत कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या पाहायला मिळतात. या मंडळींनी पोलिसांपासून शाळेच्या पर्यवेक्षकांनाही 'मॅनेज' केलेले असते. बोर्डाच्या परीक्षेकरिता एका बाकावर एकच विद्यार्थी बसवण्याची सक्ती असताना परीक्षा केंद्रांमध्ये २ विद्यार्थ्यांना एकाच बाकावर बसवून एकमेकांच्या संगनमताने पेपर सोडवण्याची अनुमती दिली जाते. काही ठिकाणी पेपर सोडवण्याचा कालावधी संपण्याच्या काही मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची, एकमेकांना उत्तरे विचारण्याची अनुमती दिली जाते. काही शाळांमध्ये शाळेच्या खिडक्यांबाहेर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणाऱ्यांची जत्रा भरलेली असते. यांना पोलीसही हटकण्याची तसदी घेत नाहीत. काही विद्यार्थी तर कॉपी करण्यात अगदीच पटाईत असतात त्यांना इतका आत्मविश्वास असतो कि ते परीक्षेसाठी कधीही अभ्यास न करता मिळालेला संपूर्ण वेळ कॉपी तयार करण्यामध्ये घालवतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून काही ठिकाणी पर्यवेक्षक स्वतःच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगतात किंवा कॉपी करण्याची खुली अनुमती देतात. सरकारने यंदा ज्या पद्धतीने सिद्धता केली आहे ते पाहता यंदा कॉपी करण्यावर बऱ्याच प्रमाणात आळा बसेल असे म्हणण्यास हरकत नाही.

पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली कि मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

**–जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**

◆ पान ४ वरून पुढे...

## लिंबागणेश तंटामुक्ती...

गावपातळीवरच सामोपचाराने मिटवण्यासाठी तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे किरकोळ वाद, जमीन वाद, कौटुंबिक तंटे तसेच इतर सामाजिक वाद पोलिस प्रशासन व ग्रामस्थांच्या सहभागातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या निवडीनंतर बोलताना डॉ. गणेश ढवळे यांनी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी दाखवलेला विश्वास सर्वांच्या सहकार्याने सार्थ करेन, अशी ग्वाही दिली. गावातील शांतता टिकवणे, तंटे कमी करणे आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे,शंकर वाणी, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अक्षय वाणी,बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड,मोहन कोटुळे, केशव गिरे, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहाय्यक अशोक लोखंडे,विष्णु गर्जे, आसराजी वीर,अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, यमुना आबदार, प्रतिक्षा शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड तालुक्यात...

घरकुलांना मंजुरी मिळाली आहे . पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या सुमारे ७ हजार १०० घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत . इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू हा अत्यावश्यक घटक आहे . हीच गरज लक्षात घेऊन शासनाने मोफत वाळू वितरणाचा निर्णय घेतला असून , त्याची अंमलबजावणी ग्रामीण भागात प्रभावीपणे होत आहे.

बीड तालुक्यासाठी दहा वाळू घाट निश्चित करण्यात आले आहेत. सिंधफणा नदीपात्रावरील रंजेगाव , रामगाव , बऱ्हाणपूर , आडगाव ,

◆ पान ४ वरून पुढे...

कुक्कडगाव , खुंड्रस , साक्षाळ पिंपरी आदी ठिकाणी वाळू उपलब्ध आहे . तसेच अंधापुरी , पिंपळादेवी , नागापूर बु. , खांडे पारगाव , पारगाव सिरस या गावांमध्ये नव्याने नोंदणी केलेल्या प्लॉटमधूनही वाळू उपलब्ध करून दिली जात आहे.

बुधवार ५ फेब्रुवारी रोजी अथरवन पिंपरी येथे तर गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी पारगाव सिरस – दोन दिवस , एकच उद्देश –
बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी अथरवन पिंपरी जवळील टुकूर नदीपात्रात खांडे पारगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना तहसीलदार शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण करण्यात आले . त्यानंतर गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारी रोजी पारगाव सिरस येथे डोंबरी नदीपात्रात घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्यात आली . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून वितरणाची कार्यवाही केली . अशाप्रकारे या टप्प्यात सुमारे ६०० ब्रास वाळूचे वितरण करण्यात येत आहे आणि जशी जशी वाळू उपलब्ध होईल त्यानुसार अधिक लाभार्थ्यांना वाळूचे वितरण करण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी नमूद केले .

पारगाव सिरस येथे छबुराव हरिभाऊ चव्हाण , शांताबाई बाजीराव नवले , राजाभाऊ गिरजाप्पा जमदाडे , जालिंदर बापूराव कणसे यांना मोफत वाळू देण्यात आली . ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर यांनी माहिती देताना सांगितले की , एकूण १८ लाभार्थ्यांपैकी पहिल्या टप्प्यात ०४ लाभार्थ्यांना वाळू देण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने वाळू देण्यात येणार आहे. सुमारे ९० ब्रास वाळूचे वितरण नियोजित आहे.

मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ शेळके यांनी या उपक्रमाबाबत बोलताना मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ – शेळके म्हणाल्या की , शासनाचा उद्देश स्पष्ट आहे – घरकुलधारकांना कोणत्याही दलालांशिवाय , कोणताही अतिरिक्त खर्च न करता वाळू मिळावी . आम्ही प्रत्येक ठिकाणी वाळू उपलब्धतेची प्रत्यक्ष पाहणी करूनच प्रस्ताव पुढे पाठवत आहोत . ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून लाभार्थ्यांची यादी , गरज आणि टप्पे ठरवले जात आहेत . घरकुलधारकांना

◆ पान ४ वरून पुढे...

वेळेत वाळू मिळाल्यास त्यांचे बांधकाम रखडत नाही , खर्च वाढत नाही आणि शासनाच्या योजनांचा खरा लाभ पोहोचतो. पुढील काळात बीड तालुक्यातील लहान नद्या , ओढे , नाले येथील वाळूही अशाच पद्धतीने घरकुलधारकांना देण्याचे नियोजन आहे.

लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांचा सहभाग – पारगाव सिरस येथे सरपंच जानकाबाई दिनकर जमदाडे , रामकिसन श्रीमंत वाटमोडे , संजय गव्हाणे , बंडू गरड , कुंडलिक गोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . सर्वांनी मिळून प्रशासनास सहकार्य करत हा उपक्रम यशस्वी केला.

घरकुल लाभार्थ्यांचे मनोगत – घर बांधायचं स्वप्न होतं , पण वाळूसाठी पैसा कुठून आणायचा हा प्रश्न होता. आता प्रशासनाने थेट नदीतून वाळू दिली , त्यामुळे घर उभं राहण्याचा आत्मविश्वास आला , असे मनोगत एका लाभार्थ्याने व्यक्त केले. तर शासन आमच्यासोबत उभं आहे , हे आज प्रत्यक्ष दिसलं , अशी भावना अनेक घरकुलधारकांनी व्यक्त केली.

एकीकडे अवैध वाळू उपशावर कठोर कारवाई आणि दुसरीकडे पारदर्शक पद्धतीने मोफत वाळू वितरण – या दोन्हींचा समतोल राखत बीड जिल्ह्यात प्रशासन काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिथे गरज खरी , तिथे प्रशासन उभं हा विश्वास ग्रामीण घरकुलधारकांच्या मनात निर्माण करणारा हा उपक्रम पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार असल्याचा विश्वास यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी व्यक्त केला .

## जिल्ह्यामध्ये मनाई...

जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## स्व.अजित दादांच्या....

◆ पान ४ वरून पुढे...

करण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दुःखद पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, यावर्षी शिवजयंती कोणतेही जल्लोषी कार्यक्रम न करता साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

## दादांचा वादा...

मंजूर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या कामासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होताच प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मोमीन सय्यद शकील अहेमद, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १, जिल्हा परिषद बीड यांनी लेखी पत्राद्वारे आंदोलनकर्ते डॉ. गणेश ढवळे यांना कळवली आहे.
लिंबागणेश ते बोरखेड रस्ता व पुलाचा कायमस्वरूपी प्रश्न सुटणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, यानिमित्ताने नेहमीप्रमाणे दादांचा वादा पूर्ण झाला अशी प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली आहे.

## कांदा पिकांवर...

जाऊन मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यंदा कांदा लागवडीसाठी रोपांची टंचाई मोठ्या प्रमाणात होती. लागवडीसाठी मजूर मिळत नव्हते . शेतकऱ्यांनी भांडवली खर्च करून कांदा लागवडी पूर्ण केल्या आहेत. रासायनिक खतांची वाढलेली किंमत वातावरणातील बदलांमुळे पिकांवर येणारे रोग, यामुळे शेतक-यांना कांदा पीक घेणे मुश्कील होत आहे. केंद्र व राज्य शासनाचे निश्चित धोरण नसल्याने कांद्याचे भाव, गडगडलेले आहेत. विक्रीयोग्य कांदा उत्पादन मार्चनंतर मोठ्या प्रमाणात होणार आहे. काढणीला आलेला कांदा बाजारात विक्रीसाठी आला तर भाव कोसळतील, असे अडतदार सांगत आहेत. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेले कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत.

◆ पान ९ वरून पुढे...

## शेतकरी व पशुपालकांना....

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत. या प्रदर्शनात जैविक शेती, पशुधनापासून होणारे लाभ याविषयी माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत. पशुप्रदर्शनात १५०० पशु प्रदर्शीत करण्यात येणार आहेत. त्याशिवाय राज्य शासनाच्या कृषी, महिला व बालविकास यासह विविध विभागांचे माहितीपर स्टॉल असणार आहेत. तसेच बचतगटांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शनास भेट देणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने या सर्वांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रदर्शनाचा परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात यावा. महिलांसाठी वेगळा कक्ष उभारून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता उपलब्ध असावी. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुंच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्याशिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णावाहिका, अग्निशमन यंत्रणा, पोलिस संरक्षण, स्वयंसेवक यांचीही नियुक्त करण्यात यावी, अशे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले. या प्रदर्शनात विविध जातींच्या पशुंचा समावेश असणार आहेत. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था, डॉग शोसह विविध प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे योग्य मूल्यांकन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यातील पशुंशिवाय परराज्यातील गुणवंत व दर्जेदार पशुपक्षी यांचेही प्रदर्शन होईल. याचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रदर्शनाच्या ठिकाणी रक्तदान शिबिर, अवयवदान संमती पत्र आदी सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. महिला व विद्यार्थ्यांना

◆ पान ९ वरून पुढे...

पशुप्रदर्शन पाहण्यासाठी दुपारच्या वेळी विशेष वेळ ठेवण्यात यावा. तसेच राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांनाही निमंत्रित करण्यात यावे. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या प्रदर्शनास राज्यातील शेतकरी, पशुपालक, पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी यांनीही उपस्थित रहावे, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी केले. पशुसंवर्धन आयुक्त देवरे यांनी प्रदर्शनाच्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनास येणाऱ्यांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून पशुधन घेऊन येणाऱ्या वाहनांसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता असणार आहे. त्याशिवाय पारितोषिक पात्र पशुधनांचे विशेष प्रदर्शन या ठिकाणी असणार आहे. तीन वेगवेगळ्या पेंडॉलमध्ये सुमारे ३०० स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रदर्शनात पशुपालकांसमवेतच या क्षेत्रातील उद्योजकही सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी जॉन्सन यांनीही प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनात येणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात वीस एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आदींची तयारी करण्यात आली आहे. स्वयंसेवक म्हणून 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. प्रदर्शनात महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पोलीसांचे हेल्प डेस्क उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## मच्छिंद्रनाथ गडावर....

पद्धत होती. या प्रकरणी १९ डिसेंबर २०२५ रोजी अंभोरा पोलीस ठाण्यात

◆ पान ९ वरून पुढे...

गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी या टोळीचा शोध सुरू केला होता.

## पोलिसांना 'कामाला'...

केला, तेव्हा त्याने मुजोरपणे उत्तर दिले की, काही चोरी झाली नाही, फक्त तुम्हाला कामाला लावण्यासाठी फोन केला होता. कठोर कारवाई करणार- पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी इशारा दिला आहे की, अशा खोट्या माहितीमुळे खरं संकट असलेल्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचायला पोलिसांना उशीर होऊ शकतो, त्यामुळे यापुढेही अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

## बीड जिल्ह्यात ....

तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांचे स्वागत केले . माजी सैनिकांच्या पेन्शन, पुनर्वसन आणि शासकीय कामकाजातील अडचणी ऐकून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही प्रशासनाने दिली. ही रॅली माजी सैनिकांच्या प्रश्नांना आवाज देणारी ठरली आहे .

## मुलीच्या लग्नाचे...

यांनी टोकाचे पाऊल उचलले. ३१ जानेवारी रोजी रात्री ७:३० वा.च्या सुमारास घराच्या पाठीमागे असलेल्या चिंचेच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. त्यांचा भाऊ बाळासाहेब वैरागे यांच्या खबरीवरून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास जमादार पठाण हे करीत आहेत.

◆ पान ९ वरून पुढे...

## बुडीत पतसंस्था ...

प्रवर्तक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. बुडीत पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ मिळावेत, जप्त मालमत्तांचा लिलाव लवकरात लवकर करून ठेवीदारांना न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका मांडली. प्रशासनाने दिरंगाई केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत ठेवीदारांनी एकजुटीने मुंबई मोर्चाला पाठिंबा देत आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## हळदीच्या दिवशीच...

दखल घेतल्यामुळे ही आग शेजारच्या दुकानांपर्यंत पसरली नाही, अन्यथा संपूर्ण मार्केट आगीच्या विळख्यात आले असते. ३० लाखांचे साहित्य जळून खाक- या आगीत दुकानदार उद्धव अंगद लांब यांचे फर्निचर, पाईप, पाण्याच्या टाक्या, सॅनिटरी वेअर आणि प्लम्बिंगचे सर्व महागडे साहित्य जळून खाक झाले आहे. उद्धव यांचा विवाह गुरुवारी सायंकाळी धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथे होता. विवाहासाठी ते गावी गेले असताना ही घटना घडली. ही बातमी मिळताच ते हळदीच्या अंगानेच केजला धावून आले.घातपाताचा संशय- आगीच्या स्वरूपामुळे नवरदेव उद्धव लांब यांनी संशय व्यक्त केला आहे की, ही आग लागली नसून कुणीतरी लावली असावी. याप्रकरणी त्यांनी घातपाताचा संशय व्यक्त केला असून शुक्रवारी ते पोलीस ठाण्यात सविस्तर फिर्याद देणार आहेत. गुरुवारी सायंकाळी त्यांचा विवाह पार पडला, तरी या घटनेमुळे आनंदाच्या वातावरणावर विरजण पडले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीडची भावना ठरलेल्या चंपावती महोत्सवास गरज पडल्यास शिवसंग्रामचा खंबीर पाठिंबा: ज्योतीताई मेटे

## कलेचा वारसा पुढे नेण्यासाठी चंपावती महोत्सव अविरत सुरू ठेवणार: अनिलदादा जगताप






**बीड । प्रतिनिधी**

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध कला प्रकारांचे एकत्रीकरण असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेची सध्या बीड जिल्ह्यात सकारात्मक चर्चा सुरू आहे. या महोत्सवामागे कलेसाठीची निष्ठा, बालकलाकारांच्या प्रोत्साहनाची धडपड आणि बीडच्या समृद्ध कलाक्षेत्रासाठी असलेली तळमळ स्पष्टपणे दिसून येत आहे. बीड रंगभूमीवर अनिलदादा जगताप यांनी उभारलेला चंपावती महोत्सव अल्पावधीतच बीड जिल्ह्याची भावना बनला असून, दरवर्षी हजारो बालकलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग या महोत्सवात पाहायला मिळत आहे. चंपावती महोत्सवासाठी जेव्हा कधी योगदान देण्याची वेळ येईल, तेव्हा शिवसंग्राम पक्ष खंबीरपणे पाठीशी उभा राहील, असे प्रतिपादन शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योतीताई मेटे यांनी चंपावती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या उद्घाटन समारंभात केले.दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी समूह नृत्य व जोडी नृत्य स्पर्धांच्या उद्घाटनासाठी ज्योतीताई मेटे उपस्थित होत्या. यावेळी डीपीआय राज्याध्यक्ष अजिंक्य चांदणे, गटशिक्षणाधिकारी समदंर खान, एबीपी माझाचे प्रतिनिधी विकास माने यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. सर्व मान्यवरांचा स्वागत व सत्कार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

यावेळी बोलताना अनिलदादा जगताप म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडचे कलाक्षेत्र अधिक समृद्ध व्हावे या उद्देशाने चंपावती महोत्सवाची सुरुवात करण्यात आली असून, कलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हा महोत्सव अविरत सुरू ठेवला जाईल. यावेळी अजिंक्य चांदणे, समदंर खान, विकास माने, संदेश लोळगे यांनीही चंपावती महोत्सव बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रासाठी सक्षम व प्रेरणादायी व्यासपीठ ठरत असल्याचे गौरवोद्गार काढत पुढील महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. काल दि. ५ रोजी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक अंतर्गत इयत्ता ४ थी ते ६ वी या गटातील समूह नृत्य व वैयक्तिक नृत्य स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांमध्ये ११२ समूह नृत्य आणि १८७ वैयक्तिक नृत्य सादरीकरणे झाली असून, बालकलाकारांनी प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली.

# अमृत संस्थेच्या ड्रोन प्रशिक्षणाची कीर्ती गोव्यापर्यंत; तेथील 30 सरकारी अधिकाऱ्यांना देणार प्रशिक्षण

### दर्जेदार अभ्यासक्रम आणि सक्षम प्रशिक्षक असल्याने गोवा सरकारकडून प्रशिक्षणासाठी अमृत संस्थेची निवड

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या अमृत या स्वायत्त संस्थेकडून राबवल्या जाणाऱ्या दर्जेदार ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाची कीर्ती गोव्यापर्यंत पोहोचली आहे. आपल्या ३० अधिकाऱ्यांना अमृत संस्थेने या संदर्भातील प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी गोवा सरकारने केली आहे. या संदर्भातील प्रस्ताव गोवा सरकारने मंजूर केला असून, अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना तसे पत्र प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, तिचे मुख्यालय पुण्यात आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यातून उद्योजक घडवण्यासाठी ही संस्था विविध योजनांसह वेगवेगळ्या प्रकारचे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमही राबवते. त्यामध्येच ड्रोन पायलट बनण्यासाठीच्या प्रशिक्षणाचाही समावेश आहे. त्यासाठी अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जाते. हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत दर्जेदार असून, लक्ष्यित घटकांसाठी तो मोफत राबवला जातो. या प्रशिक्षणाचा कार्यक्रमाचा लाभ आजपर्यंत राज्यातील १०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यातील काही जणांनी यातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या आधारे चांगली कमाई करण्यासही सुरुवात केली आहे. राज्यात आठ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

ड्रोनच्या वापराची क्षेत्रे आज विस्तारली असून, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन (सर्व्हे), व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे नेमके ओळखून अमृत संस्थेने ड्रोन मिशनची सुरुवात केली. अमृत संस्थेच्या या दर्जेदार कोर्सची कीर्ती ऐकूनच गोवा सरकारने आपल्या ३० अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्याचा प्रस्ताव अमृत संस्थेकडे ठेवला.

गोवा सरकारच्या नियोजन, सांख्यिकी आणि मूल्यांकन संचालनालयाचे संचालक विजय सक्सेना यांनी या संदर्भात अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना पत्र पाठवले आहे. 'अमृत संस्थेच्या अमृत ड्रोन मिशनबद्दल आम्हाला कळले. यासाठी अमृत संस्थेने तयार केलेला अभ्यासक्रम अत्यंत उच्च दर्जाचा आहे. तसेच यातील प्रशिक्षकही अत्यंत अनुभवी आणि सक्षम आहेत. गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना स्मॉल रिमोट पायलट सर्टिफिकेट (आरपीसी) प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव असून, हे प्रशिक्षण अमृत संस्थेच्या माध्यमातून देण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे,' असे सक्सेना यांनी त्या पत्रात लिहिले आहे.

# वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या क्रीडा संघात आदित्य कृषी महाविद्यालयाचा डंका

### खो-खोमध्ये तीन तर कबड्डीत दोन विद्यार्थ्यांची निवड ; आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी प्रतिनिधित्व





**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा क्षेत्रात आपला कायम दबदबा निर्माण करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या संघात पाच विद्यार्थ्यांची निवड घडवून आणत आपली गुणवत्ता अधोरेखित केली आहे. सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळे आदित्यचा डंका विद्यापीठ स्तरावरही घुमत आहे. विद्यापीठ स्तरावरील खो-खो आणि कबड्डी या प्रमुख खेळांच्या संघांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. खो-खो संघात तीन तर कबड्डी संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या निवडीबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे अभिनंदन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कबड्डी संघासाठी कुंभार सुगंधा व खेडकर मनीषा तर खो-खो संघात शेंडे सौरव, श्रीराम सानिका आणि वाघमारे शैलजा यांना संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन, क्रीडा शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत महत्त्वाची ठरली आहे. आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदिती सारडा विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना म्हणाल्या की विद्यार्थ्यांची निवड ही केवळ खेळातील कौशल्यावर आधारित नसून त्यांच्या शिस्त, सांघिक भावना आणि धैर्य या गुणांमुळे झाली आहे. महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्व खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून आगामी आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# संत शिरोमणी गजानन महाराज प्रकटदिन उत्सावाचे आयोजन

### नगर रोड येथील गजानन महाराज मंदिराच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमांची रेलचेल

**बीड । प्रतिनिधी**



नगर रोडवरील चर्हाटा फाटा येथील गजानन महाराज मंदिरात प्रकटदिन उत्सव दि.६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. येथील मंदिराच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वरील तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. तरी भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. येथील मंदिरात शुक्रवारी दि.६ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक प्रवीणकुमार बांगर, मुरलीधरराव बाणाईत, मेघराज कल्याणराव पिंगळे यांच्या हस्ते श्रींच्या मुर्तीस अभिषेक, दुपारी ४ ते ५ हभप रामहरी महाराज रसाळ यांच्या सुश्राव्य प्रवचन, संध्याकाळी ५ ते ७ हभप शिवाजी महाराज मिसाळ यांचे अभंग गायन व रात्री ८ ते १० यावेळेत हभप शिवाजी महाराज मिसाळ यांचे किर्तन, शनिवारी दि.७ रोजी सकाळी अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर व डॉ. अनिमेष पैठणकर यांच्या हस्ते श्रींच्या मुर्तीस अभिषेक,

# कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुटी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक-२०२६ करिता शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. तरी निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/ अधिकारी / कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन कामगार उप आयुक्त नितीन पां. पाटणकर यांनी केले आहे.



मतदानासाठीची ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातंर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागु राहील. (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी ,हॉटेल, खाद्यगृहे,अन्नगृहे,नाट्यगृहे,व्यापार,औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत देण्याबाबत संबंधित आस्थापना मालकांनी दक्षता घ्यावी,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

मतदारांकडुन मतदानाकरिता सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल. अशी तरतुद वर संबंधित शासन परिपत्रकात आहे याची नोंद घ्यावी. तरी मतदान क्षेत्रात असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी, हे कामानिमीत्त निवडणूक क्षेत्राबाहेर असल्यास अशा कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना वर नमुद केल्यानुसार मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी सुट्टी देण्यात यावी. असे आवाहन कामगार उप आयुक्त नितीन पां.पाटणकर यांनी केले आहे.

यासंदर्भात होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील कामगार उप आयुक्त यांच्या कार्यालयामध्ये दक्षता कक्ष स्थापन करण्यात आला असून संबधित कामगार, कामगार संघटनांनी दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३३४६०३ यावर संपर्क साधावा.

# राष्ट्रसंत गाडगे महाराजांची सार्वजनिक १५० वी जयंती भव्यतेने साजरी करण्यासाठी ८ फेब्रुवारीला बीडमध्ये महत्त्वपूर्ण बैठक

**बीड । प्रतिनिधी**

समाजप्रबोधन, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि सामाजिक समतेचा संदेश देणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीड शहरात भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सार्वजनिक जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष ॲड. सुधीर जाधव यांनी दिली आहे. ही बैठक रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ठीक १ वाजता,राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतिक सभागृह, मोंढा रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व समाजबांधव, गाडगेबाबांचे अनुयायी, प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व युवकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकवाढवावी, असे आवाहन गणेश जगताप बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुधीर जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, पप्पू शिंदे, विलास जाधव, जयंत राऊत, जगन्नाथ शिंदे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, मनोज वाघमारे, बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, उपाध्यक्ष जिजा शिंदे, कार्याध्यक्ष संजय साळुंके, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर सचिव अतुल साळुंके, कार्याध्यक्ष संतोष भालेकर, शितल राऊत, अमोल काळे, संदीप जाधव, प्रा. विजय जाधव, मनोज नवले, गणेश धोंगडे, विकी नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके,

**जाहीर प्रगटन**

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला,**
**अंबिका चौक, पांगरी रोड, शाहू नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

जावक क्र.१४
दिनांक. ०२/३/२०२५
तक्रार क्रमांक : ३२७/२०२३

**अर्जदार:-१. सुनंदा भाऊसाहेब परसे २. भाऊसाहेब पांडुरंग परसे**
विरुध्द

गैरअर्जदार :- २. अश्विनी सुनिल वांढर, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड. रा.विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड ता. जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड, जि. बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड. रा. राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड.

वर नमुद तक्रारदार यांना विरुद्ध पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक - ०२/०१/२०२५
ठिकाण - बीड

(स्वाक्षरीत)
प्रबंधक
शिक्का
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड,**
**ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७०/२०२६**
**सचिन माने वि. निरंक**

ज्यापेक्षा रत्नमाला भ्र. जालींदर माने, हे दिनांक ०२/०१/२०२६ रोजी मानेवाडी, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार- **सचिन पि.जालींदर माने, वय ४५ वर्षे, धंदा. शेती, रा. संस्कार कॉलनी, गयानगर, जालना रोड, बीड, ता.जि. बीड. २. दिपमाला भ्र. उमेश गायकवाड, वय ४२ वर्षे, धंदा. घरकाम, रा.श्रीराम नगर, बीड, ता.जि.बीड. ३. विद्या भ्र. उमेश माने, वय. ३९ वर्षे, धंदा. घरकाम, रा.संस्कार कॉलनी, गयानगर, जालना रोड, बीड, ता.जि.बीड. ४. यशराज पि. उमेश माने, वय २० वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. ५. साईराज पि. उमेश माने, वय १८ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे**

अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन, अर्जदार क्र. २ ही मयताचा विवाहीत मुलगी आहे, अर्जदार क्र. ३ ही मयताची सुन असुन, अर्जदार क्र. ४ व ५ हे मयताचे नातु आहेत. मयताचे पती सन २०१९ साली मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामें रत्नमाला भ्र. जालींदर माने, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख ०४/०३/२०२६ ही आहे.** आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(ॲड. जाधव टी.व्ही. यांचे मार्फत)**

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०६/२०२६**
**सुर्यकांत माणिकराव गोरे विरुध्द ग्रा.पं. कार्या. हिंगणी (बु.)**

**पहा,**
**१. सूर्यकांत माणिकराव गोरे, रा. हिंगणी (बु.) ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक स्वाती सुर्यकांत गोरे यांचा दिनांक १०/०१/१९८२ रोजी** जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **हिंगणी (बु.) ता.बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **हिंगणी (बु.) ता. जि. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबतआदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०२/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०३/२०२६ ही आहे.**

शिक्का
(स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड.

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२६ •

## लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध डॉ. गणेश ढवळे यांची निवड



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज गुरुवार, दिनांक ०५ रोजी सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी सभेत विविध विषयांचे सविस्तर वाचन करून ग्रामस्थांना माहिती दिली. या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली, तर सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी त्यास अनुमोदन दिले. ग्रामस्थांनी एकमुखाने त्यांच्या नावाला पाठिंबा दिला. निवडीनंतर सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत गावातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी यापूर्वी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी, गावातील शांतता, सलोखा आणि सौहार्द वाढविण्यासाठी डॉ. गणेश ढवळे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. महाराष्ट्र शासनाने माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत, गावातील वाद-विवाद ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड तालुक्यात मोफत वाळू वितरणातून घरकुलधारकांना दिलासा

## पारगाव सिरस आणि अथरवन पिंपरी येथे शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या मोफत वाळू वितरण धोरणामुळे बीड तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी दिसू लागली आहे . घरकुलासाठी लागणारी वाळू मिळवताना येणारा आर्थिक ताण , अवैध वाळूची अडचण आणि वाहतुकीचा खर्च या सगळ्यांतून सामान्य ग्रामीण कुटुंबांना मुक्त करण्याचा प्रयत्न प्रत्यक्षात साकार होत असल्याचे चित्र बीड तालुक्यात दिसून येत



आहे . माती , दगड , वाळूवर उभं राहतं घर... पण आधार मिळतो तो शासनाचा हातभर.... राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची काटेकोर अंमलबजावणी बीड जिल्ह्यात सुरू आहे . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे विभागस्तरावर वेळोवेळी आढावा घेत मार्गदर्शन करत असून , बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत . घरकुलधारकांना मोफत वाळू मिळालीच पाहिजे यासाठी जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्यासोबत सर्व अधिकारी , कर्मचारी यांच्या बैठका घेतल्या आहेत . सूचना दिल्या आहेत . त्याचाच परिपाक म्हणून जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरकुल धारकांना मोफत वाळू मिळत आहे .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवत उपलब्ध वाळू , प्रस्ताव आणि वितरण याबाबत समन्वय साधला आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि प्रभारी गौण खनिज अधिकारी नरेंद्र कुलकर्णी यांनीही या प्रक्रियेला प्रशासकीय दिशा दिली आहे .

घरकुलांची मोठी गरज , मोफत वाळूचा मोठा आधार -

बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३५३ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून , त्यापैकी २३ हजार ३८६ ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी १० वी व १२ वी च्या परिक्षा होणार असून महाशिवरात्री, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरे होणार असून विविध राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्याच्यां न्याय मागण्यासाठी प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही ▶▶ उर्वरित पान २ वर

# स्व.अजित दादांच्या निधनामुळे शिवजयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

## शासकीय महापूजा, अभिवादन करून साधेपणाने साजरी होणार शिवजयंती

बीड । प्रतिनिधी

राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री, दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे बीड येथे बीड शहर सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने दरवर्षी साजरे होणारे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान सकाळी ७:०० वा. होणाऱ्या शासकीय महापूजा आणि अभिवादन सभेस मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर च्या वतीने करण्यात आले आहे. गेल्या ३० वर्षांपासून बीड शहरात, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहराच्या आयोजनातून डीजेमुक्त आणि वर्गणी मुक्त असणारी शिवजयंती, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आदर्श पद्धतीने साजरी केली जाते. सालाबादप्रमाणे यंदाही जल्लोषात शिवजयंती साजरी ▶▶ उर्वरित पान २ वर

### परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा

**परंपरेप्रमाणे सकाळी ७:०० वा. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहरचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी तसेच विविध मान्यवर यांच्या हस्ते शासकीय महापूजा आणि अभिवादन करून साधेपणाने शिवजयंती साजरी केली जाणार आहे. शासकीय महापूजा आणि अभिवादन कार्यक्रमासाठी दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:०० वा. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.**



*सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन बीड दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ दिनांक ९ फेब्रुवारी रोजी पासून होणार आहे या निमित्ताने निमंत्रण देताना ट्रस्ट चे अध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे यांनी ह. भ. प. नाना महाराज कदम ,ह भ प ज्ञानेश्वर माऊली मांजरेकर, यांना प्रत्यक्ष भेटून निमंत्रण पत्रिका देताना यावेळी पांडुरंग जानोळे मामा बाबुराव परळकर प्रधान पवार प्रधान पवार उत्तम बहिरवाळ इत्यादी सह प्रवीण चव्हाण दिसत आहेत.*

# दादांचा वादा पूर्ण लिंबागणेश ते बोरखेड वाहून गेलेल्या रस्ता-नळकांडीपुल दुरुस्तीसाठी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर; दुग्धाभिषेक आंदोलनाची दखल

लिंबागणेश । प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड हा महत्त्वाचा रस्ता व नळकांडी पुल वाहून गेल्याने परिसरातील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. याचा मोठा फटका वाणी वस्ती, घोलप वस्ती, गावडे वस्ती, ढवळे वस्ती, घरत वस्ती, मुळे वस्ती आदी भागातील दुग्ध उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ व शालेय विद्यार्थ्यांना बसत होता. रस्ता व पुलाच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असताना लोकप्रतिनिधी व अधिकारी केवळ पाहणी करून फोटोसेशन व



पोकळ आश्वासने देत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात होता. अखेर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ३० सप्टेंबर रोजी वाहून गेलेल्या रस्ता व पुलावर तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.आता तरी अजितदादा पावतील का? असा सवाल उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनाची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने तातडीने तात्पुरती डागडुजी करत रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

दरम्यान, तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तलाव, बंधारे, रस्ते व पुलांच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले होते. त्याच अनुषंगाने लिंबागणेश ते बोरखेड रस्ता व पुलाच्या सरफेस दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजना लेखाशीर्ष ३०५४-३१२१ (ग्रामीण रस्ते विकास योजना) अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये २० लक्ष रुपयांचे काम ▶▶ उर्वरित पान २ वर

# कांदा पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव, शेतकरी हवालदिल

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या विविध परिसरात सततच्या ढगाळ वातावरणामुळे कांदा पिकांवर मात्रा व करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे महागडी औषधे फवारणी करावी लागत आहेत परिणामी उत्पादन खर्चात वाढ होत असल्याने शेतकरीवर्गातून चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या अनेक गावांमध्ये बारमाही पाणी उपलब्ध असल्याने बीड तालुक्यात सुमारे एक हजार हेक्टर कांदा लागवड झाली आहे. अधिक पैसा मिळवून देणारे नगदी पीक म्हणूनही शेतकरी कांद्याकडे आकृष्ट होत आहेत. मागील वर्षांची तुलना करता यावर्षांत कांदापिकाचे चांगले पैसे झाले,



मागील वर्षी शेतकऱ्यांना हजारों रुपयांचा तोटाही सहन करावा लागला आहे. आता सततच्या ढगाळ वातावरणामुळे माया रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतकऱ्यांना विविध कंपन्यांची औषधे वाढीव किंमतीवर घ्यावी लागत असल्याने शेतकयांना नाहक खर्च करावा लागत आहे. योग्य औषधांच्या नियोजनासाठी कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोलीस भरती : १७४ जागेस ८,१३४ अर्ज; ११ फेब्रुवारीला मैदानी चाचणी

बीड । प्रतिनिधी

बीड पोलिस दलात भरती होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या तरुणाईसाठी मोठी बातमी आहे. जिल्हा पोलिस दलातील १७४ जागांसाठी तब्बल ८,१३४ उमेदवारांनी अर्ज केले असून, या भरतीची रणधुमाळी येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर ही प्रक्रिया पार पडणार आहे. पोलिस भरती प्रक्रियेतील सवारत महत्त्वाचा टप्पा असलेल्या मैदानी चाचणीचे वेळापत्रक निश्चित झाले आहे. पुरुषांसाठी ११ ते १६ फेब्रुवारी दरम्यान चाचणी घेतली जाईल. तर महिला उमेदवारांची चाचणी १७ व १८ फेब्रुवारी रोजी पार पडेल. एका जागेसाठी सरासरी ४६ उमेदवार मैदानात उतरणार असल्याने चुरस मोठी





असणार आहे. सध्या या भरतीची पूर्व तयारी सुरू आहे.

लेखी परीक्षेत बुद्धीचा कस-

मैदानी चाचणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची पुढे लेखी परीक्षा घेतली जाईल. यात सामान्यज्ञान, गणित, बुद्धिमत्ता आणि मराठी व्याकरण या विषयांत उमेदवारांच्या बुद्धीचा कस लागणार आहे.

अशी होणार शारीरिक चाचणी-

मैदानी चाचणीत धावणे आणि गोळाफेक या क्रीडा प्रकारांचा समावेश असेल. प्रत्येक टप्प्यावर पोलिस उपअधीक्षक आणि निरीक्षकांचे विशेष लक्ष असेल.

सरावासाठी अवघे ६ दिवस-

भरतीची तारीख जाहीर झाल्याने उमेदवारांची धावपळ उडाली आहे. हातात सरावासाठी आता अवघे सहा दिवस उरल्याने मैदानावर सकाळपासूनच तरुणांची गर्दी पाहायला मिळत आहे.

पोलिस अधीक्षकांची बैठक-

पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी भरती प्रक्रियेच्या नियोजनासाठी सोमवारीच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. भरती पूर्णपणे पारदर्शक आणि डिजिटल होणार असून, कुणीही आमिषाला बळी पडू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासह अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### आमिष दाखवणाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन

**पोलिस भरती करून देतो, असे सांगून पैसे उकळणाऱ्यांपासून सावध राहा. भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने होणार आहे. जर कोणी पैशांची मागणी करत असेल, तर घाबरू नका. अशा फसवणूक करणाऱ्यांची तक्रार थेट पोलिस अधीक्षक यांच्याकडे करावी, असे आवाहन पोलिस दलाने केले आहे.**

### सीसीटीव्ही आणि बायोमेट्रिकची नजर

**पारदर्शकतेसाठी संपूर्ण मैदानावर सीसीटीव्ही आणि हँड कॅमेऱ्यांची नजर असेल. उमेदवारांची बायोमेट्रिक हजेरी घेतली जाईल. धावण्यासाठी आरएफआयडी तंत्रज्ञान आणि गोळाफेकीसाठी डिजिटल मीटरचा वापर केला जाणार आहे.**

### उत्तेजक द्रव्यांना लगाम

**उमेदवारांनी उत्तेजक पदाथारचे सेवन करू नये, याची खबरदारी घेतली जात आहे. यासाठी वैद्यकीय आणि फॉरेन्सिक पथक तैनात असेल. कोणालाही विनापरवाना प्रवेश दिला जाणार नाही. मागील वेळी एका उमेदवाराने उत्तेजक पदार्थ सेवन केल्याचा संशय होता. त्याला पोलिसांनी बाजूला घेत कारवाई केली होती.**